# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - (०२२) २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Website:www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- २/एनजीसी/फार्मसी/मान्यता/२०१७/1098
दिनांक:- 22 JUN 2017

प्रति,
प्राचार्य,
आर.एल.तावडे फांऊडेशन्सचे,
सरोजनी कॉलेज ऑफ फार्मसी,
५७६,राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६००८.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्वावर नविन पदवी औषधनिर्माण संस्था सुरु करणेबाबत.

संदर्भ :- १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. वेस्टर्न/२०१७/१-३३७०५१७४२१, दि. ३० एप्रिल, २०१७.
२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१७/प्र.क्र.२२७/तांशि-४, दि.२३ मे, २०१७.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्वावर नविन पदवी औषधनिर्माण संस्था सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | बी.फार्मसी | १०० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तसेच आंपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदान तत्वावर संस्थेमध्ये नविन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु १२.०० कस्टमर आयडी. ४२३०५३३९७ दि. ०८.०६.२०१७, अन्वये कर्णाटक बँक लि., शाखा- कोल्हापूर सायबर कॅम्पस , येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच व्दितीय वर्षासाठी रुपये १०.५० लाख सयुक्त खात्यात जमा करुन सदर मुदत ठेवीची मुळ पावती पडताळणीसाठी या कार्यालयास सादर करणे.

संदर्भाकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे नविन पदवी औषधनिर्माण संस्था सुरु करण्यास व संबंधीत विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहीत पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / वास्तुकला परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवळी अद्ययावत करतील.
३. शासनाने, या संचालनालयाने, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / वास्तुकला परिषद नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.
४. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

उपरोक्त तसेच संदर्भीन शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

(चंद्रशेखर ओक, भा.प्र.से.)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र. २ -अ , मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र. ३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.